MHAK070008242023

**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१५८/२०२३</u>**
**<u>निशाणी क्र.५ खालील आदेश</u>**
नुसरत अंजुम जलाल वि. जलाल करीमोद्दीन
(दिनांक ०८.१२.२०२५ )

प्रस्तुतचा प्रकरण हे अर्जदाराने महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम २००५ (संक्षिप्ततेकरीता 'संरक्षण कायदा') च्या तरतुदीप्रमाणे संरक्षण अधिकारी, बाळापूर यांचेमार्फत दाखल केले आहे. त्यामध्ये तिने संरक्षण कायद्याचे कलम २३(२) प्रमाणे अंतरिम पोटगी म्हणून रु.१४,०००/- प्रतिमाह, प्रतिबंध आदेश व निवास आदेशाची मागणी केली आहे.

**<u>अर्जदाराचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे:-</u>**

२. अर्जदार क्र.१ चे लग्न गैरअर्जदार क्र.१ सोबत दिनांक ०२.०२.२०२० रोजी मुस्लीम धार्मिक तीरिवाजाप्रमाणे झाले होते. लग्नाचा सर्व खर्च अर्जदाराच्या वडीलांनी केला होता आणि लग्नात गैरअर्जदार यांचे मागणीनुसार अर्जदार यांचे वडीलांनी सोन्याची अंगठी, अर्जदाराला मोठी पोत १० ग्रॅम, मंगळसुत्र ५ ग्रॅम, कानातील ५ ग्रॅम इ. सोन्याचे दागिणे आणि संसारोपयोगी वस्तू स्वरुपात अंदाजे रु.४,००,०००/- किंमतीच्या भेट म्हणून दिला आहेत. लग्न झाल्यानंतर अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ चे एकत्रीत कुटुंबात सोनटक्के प्लॉट, अकोला, ता. जि. अकोला येथे नांदण्यास गेली, एकत्रीत कुटुंबामध्ये गैरअर्जदार क्र.१ ते ४ राहत होते. गैरअर्जदारांनी अर्जदार सुरुवातीचे दोन महिने चांगली वागणुक दिली, परंतु गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला माहेरावरुन दोन लाख रुपये त्यांचे कर्ज फेडण्यासाठी व सोन्याचे दागिणे इ. घेवून आणण्यासाठी सांगून गैरअर्जदार यांनी अर्जदाराला शारिरीक व मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली. गैरअर्जदार हे अर्जदार हिचे सोबत वाद करुन चापटाबुक्कांनी मारहाण करीत होते तसेच अर्जदाराला अश्लील भाषेत शिवीगाळ व अपमानीत करीत होते. सदरहू त्रासामुळे अर्जदार हिने तिचे माहेरावरुन रु.५५,०००/- आणून गैरअर्जदार यांना दिले होते. जेणेकरुन तिला गैरअर्जदार यांचेकडून होत असलेला शारिरीक व मानसिक त्रास बंद होईल. सदर पैसे दिल्यानंतर गैरअर्जदार यांनी अर्जदाराला १

महिना चांगली वागणुक दिली, परंतु त्यानंतर पुन्हा गैरअर्जदार क्र.१ ने बांधकाम मजुरांची मजुरी देण्यासाठी अर्जदाराला माहेरावरुन रु.३५,०००/– आणण्यासाठी तगादा लावला. त्यानुसार अर्जदार हिने गैरअर्जदार क्र.१ कडून चांगली वागणुक मिळण्याच्या अपेक्षेने तिचे माहेरावरुन रु.३५,०००/– आणून गैरअर्जदार क्र.१ याला दिले.

३. अर्जदार क्र.१ ने या पुढे असे कथन केले की, त्यानंतर गैरअर्जदार यांची पैशाची मागणी वाढत गेली. गैरअर्जदार क्र.१ याने अकोला मध्ये घर घेण्यासाठी अर्जदार हिला तिचे माहेरावरुन रु.१,००,०००/– आणण्यास सांगत होता. तसेच सर्व गैरअर्जदार हे पैशासाठी अर्जदार हिचा शारिरीक व मानसिक त्रास देत होते. त्यानुसार अर्जदार हिने तिचे माहेरावरुन रु.१,००,०००/– आणुन गैरअर्जदार क्र.१ याला दिले होते. या पुढे असे की, गैरअर्जदार क्र.२ याचे इलाजाकरीता गैरअर्जदार यांचे मागणीनुसार अर्जदार हिने तिचे माहेरावरुन रु.४२,०००/– त्यांना आणून दिले होते. अर्जदार हिने तिला चांगली वागणुक मिळण्याच्या अपेक्षेने गैरअर्जदार यांना वेळोवेळी मागणी करीत गेलेली रक्कम त्यांना माहेरावरुन आणून देत होती. त्यानंतर सुध्दा गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला चांगली वागणुक दिली नाही व रु.२,००,०००/– माहेरावरुन आणण्यासाठी तगादा लावला आणि पाय तोडण्याची धमकी दिली.

४. या पुढे असे की, गैरअर्जदार क्र.१ याचा अर्जदार हिचे सोबत चांगला व्यवहार नव्हता, गैरअर्जदार क्र.१ हा दररोज रात्री २–३ वाजता घरी यायचा व अर्जदारसोबत वाद करुन तिला रात्री घराच्या बाहेर हाकलुन देत होता. गैरअर्जदार क्र.३ ही अर्जदार हिला सर्व घरकाम केल्यानंतर सुध्दा प्रत्येक कामात चुका काढून तिला चापटाबुक्क्यांनी मारहाण करीत असे व जास्तीचे काम सांगून तिचा मानसिक व शारीरीक छळ करीत असे. गैरअर्जदार क्र.३ ही अर्जदार हिला पोटभर जेवण देत नसे आणि सर्व गैरअर्जदार यांचे जेवण झाल्यावर शिल्लक राहिलेले तेवढेच अर्जदाराला देत असे. गैरअर्जदार क्र.३ ही गैरअर्जदार क्र.१ याला अर्जदार हिचे सोबत बोलू देत नसे तसेच अर्जदार हिच्या मुलाला चांगली वागणुक देत नसे. या पुढे असे की, गैरअर्जदार क्र.२ हे अर्जदार हिचे सासरे असून तिच्यासोबत घरकामावरुन वाद करुन अर्जदारासोबत अश्लील भाषेत शिवीगाळ

करीत आणि तिचे अंगावर मारण्यासाठी जात होते. गैरअर्जदार क्र.४ हा अर्जदार हिचा जेठ असून त्याला दारुचे व्यसन होते, तो अर्जदार हिच्या सोबत वाद करुन तिला मारहाण करीत होता. गैरअर्जदार क्र.५ व ६ ह्या अर्जदार हिच्या नणंदा असून त्या तिला क्षुल्लक कारणावरुन टोमणे देत असत तसेच चापटाबुक्कांनी मारहाण करीत होते. गैरअर्जदार हे गैरअर्जदार क्र.१ ला अर्जदाराविरुध्द भडकावून देत होते.

**५.** अर्जदार हिला गैरअर्जदार क्र.१ कडून दिनांक २९.०१.२०२२ रोजी मुलगा आरीश झाला त्यानंतर काही दिवसांनी अर्जदाराने गैरअर्जदार क्र.१ ला तिला सासरी घेवून जाण्याची विनंती केली असता त्याने अर्जदाराला माहेरावरुन रु.५०,०००/– सोबत आण नाहीतर सासरी नेणार नाही. त्यामुळे अर्जदार हिला नाईलाजाने तिच्या माहेरी राहावे लागले. त्यानंतर अर्जदार हिने महिला तक्रार, कोला यांच्याकडे तक्रार दिल्यानंतर गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिला चांगली वागणूक देण्याची हमी दिली त्यामुळे अर्जदार तिचे मुलासह सासरी नांदावयास गेली. परंतु पुढील १५ दिवसांनी गैरअर्जदार याने अर्जदार हिला माहेरावरुन रु.२,००,०००/– आणण्यासाठी तगादा लावला व तिला मारहाण करीत होते. दिनांक २०.१०.२०२२ रोजी गैरअर्जदार क्र.१ याने गोडी गुलाबीने अर्जदाराला मुलासह माहेरी आणुन सोडले आणि त्यानंतर रु.२,००,०००/– आणल्याशिवाय सासरी यायचे नाही, असे सांगितले. त्यामुळे तेव्हा पासून अर्जदार ही तिच्या मुलासह नाईलाजाने तिचे माहेरी राहत आहे. .

**६.** या पुढे असे की, अर्जदार हि तिचे मुलासोबत तिचे आई वडीलांचे घरी वडीलांवर अवलंबुन राहावे लागत आहे, अर्जदार हिला कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. याउलट अर्जदार हिने कथन केले की, गैरअर्जदार क्र.१ हा बांधकाम ठेकेदारीचे काम करीत असून त्यापासून महिन्याला रु.५०,०००/– कमावितो. तसेच गैरअर्जदार क्र.२ हे सेवानिवृत्त कर्मचारी असून त्यांना रु.२५,०००/– निवृत्ती वेतन मिळते. गैरअर्जदार क्र.१ यांच्यावर अर्जदार व त्यांच्या मुला शिवाय इतर कोणाचीही जबाबदारी नाही. त्यामुळे अर्जदार व त्यांच्या मुलांच्या भरणपोषणाकरीता अर्जदाराचा अर्ज मंजुर होवून अंतरिम आदेश होण्यास विनंती केली आहे.

**<u>गैरअर्जदारांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणेः–</u>**

७. गैरअर्जदार यांनी त्यांचे लेखी म्हणणे (नि.क्र.१७) दाखल करुन त्यांचे नातेसंबंध मान्य केले आहे. या व्यतिरीक्त त्यांनी संपुर्ण अर्जास विरोध केला आहे. गैरअर्जदार यांच्या कथनाप्रमाणे अर्जदार ही सासरी एक महिना चांगली राहीली त्यानंतर तिने वेगवेगळ्या कारणावरुन गैरअर्जदार क्र.१ याच्याशी भांडण करु लागली तसेच गैरअर्जदार क्र.१ ते ६ यांना त्रास देवून वेगळे राहण्याचा तगादा लावला. गैरअर्जदार क्र.१ याच्यावर त्याचे वयस्कर आई वडील यांची जबाबदारी असून देखील त्या गोष्टीचा विचार न करता त्यास वेगळे राहण्याचा अर्जदार हिने तगादा लावला. अर्जदार हिच्या मागणीप्रमाणे गैरअर्जदार क्र.१ हे तिच्यासोबत भाड्याच्या खोलीत वेगळे राहू लागले तरी देखील अर्जदार ही त्याच्या सोबत व्यवस्थीत राहत नव्हती व त्यास मानसिक छळ करीत होती.

८. गैरअर्जदार यांच्या कथनांनुसार अर्जदार ही तिच्या पतीस ती त्याच्या ऐपतीची नाही व तिला गैरअर्जदार क्र.१ हा पसंत नाही, म्हणून रु.१,००,०००/– देवून त्याच्या पासून फारकत घेण्यास सांगत होती. तसेच ती घरातील कोणतेही काम किंवा जेवण बनवित नसे तसेच अर्जदार ही सतत फोनवर बोलत असे. त्याचप्रमाणे गैरअर्जदार क्र.१ याच्यासोबत वारंवार वाद घालून तिच्या माहेरी न सांगता निघुन जात असे. गैरअर्जदार क्र.१ याच्या कथनांनुसार तो मोल मजुरी करुन प्रतिदीन रु.३००/– कमवितो तसेच त्याच्यावर त्याच्या वयस्कर आई वडीलांची देखील जबाबदारी आहे. याउलट, अर्जदार ही हातरुण येथे तिच्या आई वडीलांकडे राहत असून ती शिलाई मशीनचे काम करुन दररोज रु.४००/– कमविते. अर्जदार हिस गैरअर्जदार क्र.१ हा सांभाळण्यास तयार असून अर्जदार ही त्याच्याकडे राहवयास तयार नाही. तसेच त्याचा लहान मुलगा याास देखील ती गैरअर्जदार क्र.१ यास भेटू देत नाही. सबब, गैरअर्जदार यांच्या कथनांनुसार गैरअर्जदार यांनी अर्जदार हिस कोणत्याही प्रकारे कौटुंबिक हिंसाचाराची वागणुक दिलेली नाही, उलट अर्जदार हिने गैरअर्जदार यांच्यासोबत राहत असताना त्यांना शारिरीक व मानसिक छळवणुक केली तसेच प्रस्तुतचा अर्ज हा गैरअर्जदार यांच्याकडून पैसे उकळण्याच्या हेतूने दाखल केलेला असल्याने तो नामंजुर होण्याची विनंती केलेली आहे.

**९.** अर्ज, सर्व कागदोपत्री पुरावे व प्रकरणाचा अभिलेख पाहिला. अर्जदारातर्फे विधीज्ञ श्रीमती एच. बी. टिकार यांचा युक्तीवाद ऐकला. गैरअर्जदारतर्फे विधीज्ञ एन. एन. जामोदे यांचा युक्तीवाद ऐकला.

**१०.** उभयतांची कथने आणि त्यांनी दाखल केलेली कागदपत्रे तथा करण्यात आलेला युक्तीवाद यावरुन या अर्जाचे निर्णयाकरीता खालील मुद्दे निघतात. ते मुद्दे आणि त्यावरील माझा निष्कर्ष मी कारणांसहित खाली नमुद करीत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदार यांनी घरगुती हिंसाचार केल्याचे अर्जदार प्रथमदर्शनी शाबीत करते काय ? | **होकारार्थी** |
| २. | अर्जदार हे त्यांच्या मागणीप्रमाणे अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | **अंशतः होकारार्थी** |
| ३. | अर्जदार ही मागणी केल्याप्रमाणे निवासी आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | **अंशतः होकारार्थी** |
| ४. | अर्जदार ही मागणी केल्याप्रमाणे संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | **होकारार्थी** |
| ५. | काय आदेश ? | **...अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीताः–**

**११.** अर्जदार यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांच्या नातेसंबंधाबाबत कोणताही वाद दोन्ही पक्षकारांनी उपस्थित केलेला नाही. त्यांचे लग्न दिनांक ०२.०२.२०२० रोजी मुस्लीम धार्मिक रितीरिवाजाप्रमाणे झालेले आहे तसेच सदर लग्न संबंधातून त्यांना एक मुलगा अर्जदार क्र.२ मो. आरीश आहे, त्याबाबत देखील कोणताही वाद उपस्थीत केलेला नाही. अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ याच्यापासून दि. २०.१०.२०२२ पासून तिच्या आई वडीलांकडे हातरुण येथे राहत असल्याचे तिने सांगितले आहे. परंतु गैरअर्जदार याने अर्जदार हिस स्वतःहून तिच्या आई वडीलांकडे नेवून

सोडले याबाबत अमान्य केले आहे.

१२. गैरअर्जदार यांनी तिचा शारिरीक व मानसिक छळ करुन सासरहुन हाकलुन दिल्यापासुन ती माहेरी दुःखी व कष्टदायक जीवन जगत असुन ती तिच्या व तिच्या मुलीच्या जिवनावश्यक मुलभुत गरजा भागवण्यास असमर्थ आहे. अर्जदार ही जेव्हापासून माहेरी राहत आहे तेव्हापासून तिच्या पालन पोषणाची, औषधोपचाराची आणि कपड्यालत्त्याची व्यवस्था गैरअर्जदारांनी केलेली दिसून येत नाही. अर्जदार हिने केलेल्या कौटुंबिक हिसांचाराच्या आरोपा बाबतच्या शाबीती पुरेशा पुराव्यानी शाबीती करण्याची जबाबदारी ही अर्जदाराची आहे. गैरअर्जदार यांनी अर्जदार हिने केलेले सर्व आरोपी अमान्य केलेले आहेत तसेच तिला कोणत्याही प्रकारे कौटुंबिक हिंसाचाराची वागणुक दिली नसल्याचे सांगितलेले आहे.

१३. गैरअर्जदार याने दाखल केलेले म्हणणे पाहता त्याने अर्जदार ही विभक्त राहत असल्यापासून तिला किंवा तिच्या मुलाला दैनंदिन खर्चाकरीता कोणतीही रक्कम अथवा मदत केल्याचे दिसून येत नाही. तसेच अर्जदार हिस नांदावयास आणण्याकरीता कोणतेही प्रयत्न केलेले दिसून येत नाहीत. सबब, अर्जदार व तिच्या मुलाकडे गैरअर्जदार क्र.१ याने दुर्लक्ष केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. म्हणून अर्जदार व तिच्या मुलाची आर्थिक छळवणुक केल्याची प्रथमदर्शनी दिसते. त्याचप्रमाणे अर्जदार हिने केलेल्या अर्जातील कथनांनुसार गैरअर्जदार याच्याकडून तिला शारिरीक व मानसिक वागणुक मिळाल्याचे दिसते. म्हणून मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देत आहे.

<u>**मुद्दा क्र.२ करीताः–**</u>

१४. अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ याची कायदेशिर पत्नी असल्याबाबत कोणताही वाद उपस्थित झालेला नाही. तसेच सदर लग्न संबंधातून दि.२९.०१.२०२२ रोजी त्यांना एक मुलगा झाला, तो अर्जदार हिच्या सोबत राहत आहे. गैरअर्जदार क्र.१ याची अर्जदार ही कायदेशिर पत्नी म्हणून व आरिश हा मुलगा म्हणून कायदेशिर व नैतिक जबाबदारी आहे. परंतु सदरची जबाबदारी त्याने अर्जदार विभक्त राहत असल्यापासून पार पाडली नसल्याचे

दिसते. अर्जदार हिने तिचे मालमत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्र दाखल केलेले असून तिच्याकडे कोणतेही आर्थिक उत्पन्नाचे साधन नसल्याचे तिने सांगितले आहे. ती सर्वस्वी तिच्या आई वडीलांवर अवलंबुन आहे तसेच तिच्यावर तिच्या मुलाची जबाबदारी असल्याचे देखील तिने सांगितले आहे. तसेच तिला दरमहा रु.३०,०००/– पालन पोषनाचा खर्च येत असल्याचे नमुद केलेले आहे. गैरअर्जदार क्र.१ याने नि.क्र.२३ कडे त्याचे मालमत्ता व दायित्वांचे प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. त्यामध्ये त्याचे शिक्षण चौथी असल्याचे त्याने सांगितले असून तो त्याच्या आई वडीलांसोबत राहत आहे. तसेच तो मजुरी काम करुन प्रतिदीन रु.३००/– एवढे कमवितो तसेच त्याच्यावर त्याच्या वयस्कर आई वडीलांची जबाबदारी असल्याचे त्याने सांगितले आहे. तसेच त्याच्या पुढील कथनांनुसार अर्जदार ही शिलाई मशिनचे काम करते व तिला प्रतिदिन रु.४००/– एवढे मिळतात. त्यामुळे तिला स्वतंत्र उत्पन्नाचे साधन आहे. म्हणून ती अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र नसल्याबाबत युक्तीवाद गैरअर्जदार यांनी केला आहे.

**१५.** अर्जदार व गैरअर्जदार यांचा युक्तीवाद व मालमत्ता व दायित्वांचे प्रमाणपत्र पाहता अर्जदार ही तिच्या आई वडीलांकडे राहत असून तिच्याकडे उत्पन्नाचे साधन असल्याबाबत कोणताही सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तिने तिच्या प्रतिज्ञापत्रात तिच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्याचे सांगितलेले आहे. परंतु गैरअर्जदार क्र.१ याने ती शिलाई मशीनचे काम करीत असल्याबाबत जरी सांगितले असले तरी त्याबाबतचा प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर येणे आवश्यक होते. सबब, अर्जदार हिच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्याचे प्रथमदर्शनी दिसते तसेच तिच्यावर तिच्या लहान मुलाची जबाबदारी असल्याचे देखील दिसून येते.

**१६.** गैरअर्जदार क्र.१ हा ठेकेदार म्हणून काम करीत असल्याबाबत तसेच त्यास दरमहा रु.५०,०००/– उत्पन्न मिळत असल्याबाबत अर्जदार हिने तिच्या अर्जामध्ये कथन केलेले आहे. परंतु गैरअर्जदार क्र.१ याने तो रु.३००/– च्या मजुरीवर काम करीत असल्याचे सांगितलेले आहे. तसेच त्याच्यावर आई वडीलांची जबाबदारी असल्याचे तो सांगतो. गैरअर्जदार याने प्रतिज्ञापत्रात नमुद केलेला मजकूर पाहता जरी त्याच्यावर आई

वडीलांची जबाबदारी असली तरी त्याची पत्नी व मुलाची कायदेशिर व नैतिक जबाबदारी तो नाकारू शकत नाही. अर्जदार ही तिच्या आई वडीलांकडे राहत असून तिच्याकडे कोणताही आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत नसल्याचे दिसून येते. म्हणून गैरअर्जदार क्र.१ याची पती म्हणून व अर्जदार क्र.२ याचा वडील म्हणून कायदेशिर जबाबदारी आहे. म्हणून मी मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.३ करीताः–</u>**

**१७.** अर्जदार हिने मागणी केलेल्या निवासी विनंतीबाबत विचार करता अर्जदार ही तिच्या आई वडीलांकडे राहत आहे. सद्या तिच्यावर तिच्या लहान मुलाची जबाबदारी दिसून येते त्यामुळे अर्जदार हिची राहण्याची सोय ही तिच्या आई वडीलांकडे असल्याकारणाने तिला वेगळी सोय देण्याची मला आवश्यकता वाटत नाही. परंतु तिच्या राहण्याच्या खर्चाबाबत तिला योग्य ती आर्थिक मदत होणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.४ करीताः–</u>**

**१८.** अर्जदार हिने तिच्या अर्जामध्ये केलेले कौटुंबिक हिंसाचाराच्या आरोपाबाबत तसेच तिला झालेल्या मारहाणीबाबत विचार करता तसेच तिला व तिच्या मुलाास गैरअर्जदार याच्याकडून भविष्यात कौटुंबिक हिंसाचारापासून बचाव होण्याकरीता अर्जदार हिस संरक्षणात्मक गैरअर्जदार याच्या विरुध्द आदेश मिळणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र.४ चा निष्कर्ष होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.५ करीताः–</u>**

**१९.** मुद्दा क्र.१ याचे विवेचन लक्षात घेता अर्जदार क्र.१ हिस गैरअर्जदार क्र.१ ते ६ यांच्याकडून कौटुंबिक हिंसाचाराची वागणुक मिळाल्याचे प्रथमदर्शनी दिसते तसेच अर्जदार व तिचा मुलगा हे अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र असल्याचे देखील दिसते, परंतु गैरअर्जदार क्र.१ याच्या उत्पन्नाचा स्त्रोत पाहता जरी त्याने तो रु.३००/– च्या मजुरीवर काम करीत असल्याचे सांगितले असले तरी तो शरीराने धनदाकट असल्याचे दिसून येते.

तसेच गैरअर्जदार याचे वय पाहता तो सक्षम इसम (able bodied person) असल्याचे दिसून येते. त्यामुळे तो दैनंदिन पालनपोषणाकरीता काम करण्यास सक्षम आहे. त्याचप्रमाणे गैरअर्जदार हा अर्जदार व त्याच्या मुलाची जबाबदारी नाकारू शकत नाही. अर्जदार हिच्या सांगण्याप्रमाणे तो ठेकेदार म्हणून काम करतो असे असले तरी त्याबाबत कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर आलेला नाही, परंतु सद्याची जिवन पध्दती व मुलाच्या पालन पोषनाची व शिक्षणाची जबाबदारी पाहता गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार व तिच्या मुलाप्रती दरमहा प्रत्येकी रु.२,५००/– देणे उचित होईल. अर्जदार ही दि.२०.१०.२०२२ पासून विभक्त राहत असून प्रस्तुतचा अर्ज हा तिने दि.१९.०६.२०२३ रोजी न्यायालयात दाखल केलेला आहे. म्हणून अर्ज दाखल तारखेपासून तिला अंतरीम पोटगी देणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार ही ग्रामीण भागामध्ये राहत असल्यामुळे तिच्या निवासाची सोय म्हणून दरमहा रक्कम रु.१,०००/– देणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार हिस कोणत्याही प्रकारे कौटुंबिक हिंसाचाराची वागणुक गैरअर्जदार यांच्याकडून देण्यात येवू नये असा संरक्षात्मक आदेश देणे गरजेचे आहे. म्हणून मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** अर्जदाराची अंतरीम पोटगीची मागणी अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**२.** गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदार हिला दरमहा रु.२,५००/– (रुपये दोन हजार पाचशे फक्त) आणि मुलगा मो. आरिश यास दरमहा रु.२,५००/– (रुपये दोन हजार पाचशे फक्त) मुळ अर्ज दाखल तारखेपासून त्याच्या निकालापर्यंत अंतरिम पोटगी स्वरुपात देण्याचा आदेश हिंसाचार कायद्याच्या कलम २० अन्वये करण्यात येत आहे.

**३.** गैरअर्जदार क्र.१ याने या आदेशाप्रमाणे अंतरिम पोटगी न दिल्यास अशा अंतरिम पोटगी वसूलीसाठी महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण नियम २००६ च्या नियम ६(५) अन्वये स्वतंत्र किरकोळ अर्ज दाखल करण्याची मुभा अर्जदाराला आहे.

४. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिला दरमहा रु.१,०००/- (रुपये एक हजार फक्त) मुळ अर्ज दाखल तारखेपासून त्याच्या निकालापर्यंत घरभाड्यापोटी देण्याचा आदेश हिंसाचार कलम १९ अन्वये देण्यात येत आहे.

५. गैरअर्जदार क्र.१ ते ४ यांनी अर्जदारावर कोणतीही कौटुंबिक हिंसाचार होईल, असे कोणतेही कृत्य करु नये, असा संरक्षण आदेश हिंसाचार कायद्याच्या कलम १८ अन्वये करण्यात येत आहे.

६. हिंसाचार कायद्याच्या तरतुदींमागील उद्देश व अर्जाचे स्वरुप विचारात घेवून उभयपक्षकारांनी प्रस्तुतचे प्रकरण सर्वोच्च प्राधान्य देवून लवकरात लवकर चालवावे.

७. या आदेशाची प्रत्येकी एक प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना विनामुल्य देण्यात यावी. तसेच, एक प्रत माहिती व पुढील कारवाईकरीता संबंधित संरक्षण अधिकारी व संबंधित पोलिस ठाणे यांना पाठवावी.

८. अर्जाचा खर्च मूळ अर्जासोबत देण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर)

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.12.08 17:01:37 +0530

दिनांक : ०८.१२.२०२५.
ठिकाणः बाळापूर

**( डी. एम. वाघमारे )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२), बाळापूर.

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | ०८/१२/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | ०८/१२/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | ०८/१२/२०२५ |